# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०२ जुलै, २०१९ / आषाढ ११, १९४१ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) गृहनिर्माण मंत्री**<br>**(३) कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**<br>**(४) कामगार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३९**

---

### झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार

**(१) * १३९७०९ श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विश्वास पाटील यांनी सेवानिवृत्तीच्या शेवटच्या काही दिवसांमध्ये निकाली काढलेल्या नस्त्यांमधील ३३ प्रकरणांपैकी ७ प्रकरणांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे चौकशीअंती निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ७ प्रकरणांपैकी ३ प्रकरणे पूर्णपणे रद्द करावीत आणि ४ प्रकरणे नव्याने सादर करण्यात यावीत अशी शिफारस गैरव्यवहाराप्रकरणी चौकशी करणाऱ्या समितीने प्राधिकरणाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू चौकशी समितीने केलेल्या शिफारशीनुसार प्राधिकरणाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्यानूसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) श्री.विश्वास पाटील, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी सेवानिवृत्तीच्या शेवटच्या दिवसांमध्ये मंजूर केलेल्या ३३ प्रकरणांचा फेरआढावा शिखर तक्रार निवारण समिती यांचेद्वारे घेण्यात आला असून ७ प्रकरणांमध्ये देण्यात आलेली मंजूरी रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सदर ७ प्रकरणातील २ प्रकरणांचे मंजूरी आदेश रद्द करण्यात आले असून एका प्रकरणातील मंजूरी आदेश अंशत: रद्द करण्यात आले आहेत. तसेच उर्वरित ४ प्रकरणांमध्ये मंजूरी रद्द करण्यात आली असून प्रकरणे फेरसादर करण्याची मूभा देण्यात आली आहे.
(३) शिखर तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने संबंधित अधिकाऱ्यांचा खुलासा मागविला असून त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत असल्याचा तसेच संबंधित विकासक व वास्तुविशारद यांना शिखर तक्रार निवारण समितीच्या शिफारशीनुसार सूचना देण्यात आल्या असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नायर रूग्णालयात (मुंबई) तीन वरिष्ठ महिला डॉक्टरांच्या रॅगिंगला कंटाळून डॉ.पायल तडवी या विद्यार्थीनीने केलेली आत्महत्या

**(२) * १४२१६९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या तीन वरिष्ठ विद्यार्थिनींकडून होणाऱ्या रॅगिंगला कंटाळून जळगावच्या डॉ.पायल तडवी या दुसऱ्या वर्षांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीने मुंबईच्या नायर रुग्णालयातील महाविद्यालयीन वसतीगृहात गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे दिनांक २४ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन वरिष्ठ विद्यार्थिनींकडून होणाऱ्या रॅगिंगला कंटाळूनच आत्महत्या केल्याचा आरोप डॉ.पायलच्या नातेवाईकांनी करून तिन्ही महिला डॉक्टरांविरोधात एफआयआर नोंदविण्यात आला असून संतप्त नातेवाईकांनी मृतदेह थेट जिल्हाधिकारी कार्यालयात नेऊन दोषींना अटक करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ.पायलच्या नातेवाईकांनी 'डॉ.पायलच्या व्हॉट्सॲप ग्रुपमधील संवादाचे पुरावे पोलीसांकडे दिले असून तीन वरिष्ठ महिला डॉक्टरांकडून डॉ.पायलचा सातत्याने जातीवरून अपमान केला जात असे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थीनीस रॅगिंग करुन आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी संबंधित वरिष्ठ डॉक्टरांवर गुन्हा दाखल करुन कठोर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी तीन आरोपींविरूध्द आग्रीपाडा पोलीस ठाणे येथे भा.द.वि. कलम ३०६, २०१, ३४ भा.द.वि. सहकलम ४ महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९, सहकलम ३ (१), (आर)(एस)(यु)(झेड-ए-ई), ३(२)(v)(vi)(vii) अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ सह सुधारित कायदा २०१५, सह कलम ६७ माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन, त्यांना अटक करण्यात आली आहे. प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(४) महाराष्ट्र शासनाने त्यांच्या अखत्यारितील डॉ.प्रकाश वाकोडे, महासंचालक, वै.शि. व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली आहे. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्यामार्फत डॉ.चंदनवाले, अधिष्ठाता, जे.जे. समुह रूग्णालय यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी सुरू आहे.

या प्रकरणात डॉ.हेमा अहुजा, डॉ.भक्ती मेहरे व डॉ.अंकिता खंडेलवाल यांना पुढील आदेश मिळेपर्यंत निलंबित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे डॉ.पायल तडवी यांच्या युनिट प्रमुख प्रा. (अति.) स्री रोग प्रसुतीशास्त्र व विभाग प्रमुख यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच डॉ. पायल तडवी यांच्या युनिट प्रमुख प्राध्यापक (अति.) यांना चौकशी सापेक्ष निलंबित केले आहे. व स्त्री रोग प्रसुतीशास्त्राच्या विभागप्रमुख यांची बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालयातून बदली करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती विमानतळ विस्तारीकरणाकरिता अधिग्रहित शेतजमिनीमधून गौणखनिजाची चोरी होत असल्याबाबत

**(३) * १३९५७१ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा निंभोरा लाहे, जळू (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील शेतजमीन बेलोरा विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी अधिग्रहित केली असून या शेत जमीनीतून अनेक महिन्यापासून गौणखनिज व मातीची चोरी होत असून संबंधीत विमानतळ विकास प्राधिकरण व प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिनांक ८ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेलोरा विमानतळाच्या ७४.८६ हेक्टर क्षेत्राव्यतिरिक्त राज्य शासनाने संपादीत केलेल्या निंभोरा व अंजनगाव बारी-बडनेरा या भागातील ३६.६३ हेक्टर शेतजमीनीमधून सुद्धा माती व मुरूम चोरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) बेलोरा विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी अधिग्रहित शेत जमीनीतून माहे जानेवारी २०१९ च्या दरम्यान माती चोरी झाल्याचे विमानतळ विकास प्राधिकरणाच्या निदर्शनास आल्याने त्यांनी पोलीसांना तोंडी कळविल्यानुसार सदर भागात लोणी पोलीसांनी रात्रीसमयीची गस्त वाढविली आहे. तसेच माहे फेब्रुवारी २०१९ मध्ये झालेल्या अवैध माती वाहतूकीबाबत तहसिलदार नांदगांव खंडेश्वर यांनी दंडात्मक कार्यवाही केली होती. तसेच सद्यस्थितीत कपांऊंड वॉल व फाऊंडेशनचे काम प्रगतीपथावर असल्याचे विमानतळ विकास प्राधिकरणाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावित सांडपाणी पुनर्प्रक्रिया प्रकल्पाबाबत

**(४) * १३९१२१ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावित सांडपाणी पुनर्प्रक्रिया प्रकल्पात सांडपाण्यातील तरंगणारे कण आणि क्षार काढून पाण्यातील ऑक्सिजनच्या पातळीचे प्रमाण हरित लवादाच्या निर्देशानुसार नसल्याने महानगरपालिकेच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला राष्ट्रीय हरित लवादाने स्थगिती दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने मलनि:सारण प्रकल्प टप्पा २ अंतर्गत पुढील २५ वर्षाचे नियोजन करत कुलाबा, वरळी, बांद्रा, वर्सोवा, मालाड, घाटकोपर, भांडूप या सात ठिकाणी प्रकल्प उभारण्याचे निश्चित केले असून त्यातील फक्त कुलाबा प्रकल्पाचे काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेतर्फे दररोज केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्यातील ७० टक्क्यांहून अधिक म्हणजे दोन हजार दशलक्ष लिटर पाणी सांडपाण्याच्या स्वरुपात समुद्रात मिसळत असल्याने पर्यावरणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त समस्यांचा विचार करता सदर प्रकल्पांची मंजूरी प्राप्त करुन लवकरात लवकर काम सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण मंत्रालयाच्या दिनांक १३.१०.२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये निश्चित केलेल्या मानकांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने मलजल प्रक्रिया केंद्राच्या दर्जोन्नती प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया सुरु केली होती.

तथापि, केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण मंत्रालयाच्या दिनांक १३.१०.२०१७ रोजीच्या अधिसूचनेस राष्ट्रीय हरित लवादाने मूळ अर्ज (याचिका) क्रमांक १०६९/२०१८ मध्ये दिनांक २१.१२.२०१८ रोजी अंतरिम स्थगिती दिली होती.

तसेच, विसर्ग मानक निश्चित करण्यासाठी हरित लवादाने समितीची नियुक्ती केली होती. हरित लवादाने या समितीच्या शिफारशी स्विकारुन त्या देशातील सर्व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाकरिता लागू असतील असे आदेश दिले व सदर याचिका दिनांक ३०.०४.२०१९ रोजी निकाली काढली.

हरित लवादाच्या निर्णयाविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या सिव्हील अपीलमध्ये, मा.सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी पारित करण्यात येणाऱ्या पुढील आदेशाच्या अधीन राहून निविदा प्रक्रिया सुरु ठेवण्याबाबत दिनांक १७.०५.२०१९ रोजी अंतरिम आदेश दिले आहेत.

(२) कुलाबा येथील ३७ द.लि.लि. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्राच्या दर्जोन्नतीच्या प्रकल्पाचे काम माहे जून, २०१६ मध्ये सुरु करण्यात आले असून, ऑक्टोबर, २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

उर्वरित ५ मलजल प्रक्रिया केंद्राच्या दर्जोन्नतीच्या निविदा प्रक्रियेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच, मालाड येथील नियोजित मलजल प्रक्रिया केंद्र हे कांदळवन असलेल्या जमिनीवर आहे. याकरीता सागरी किनारा क्षेत्र प्राधिकरणाचे (सी.आर.झेड.) ना-हरकत प्राप्त झाले आहे.

सदर प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या कांदळवनाची पुन:लागवड करण्याकरीता आवश्यक जमिन उपलब्ध झाली असून सदर प्रकल्प उभारण्याच्या अनुषंगाने पुढील आवश्यक परवानग्या मिळविण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ३७५० दशलक्ष लिटर प्रतिदिन इतका पाणीपुरवठा करण्यात येत असून, त्यापैकी २१९० दक्षलक्ष लिटर प्रतिदिन मलजल निर्माण होते.

त्यापैकी १२८५ द.ल.लि. मलजलावर, अस्तित्वात असलेल्या मलजलप्रक्रिया केंद्रामध्ये प्राथमिक प्रक्रिया करुन त्याचा समुद्रात किंवा खाडीत विसर्ग केला जातो.

तसेच १५८ द.ल.लि. मलजल खाजगी वसाहतीतील खाजगी / शासकीय/ निमशासकीय मलजल संयंत्राद्वारे प्रक्रिया करुन त्याचा विसर्ग केला जातो. उर्वरित ७४७ द.ल.लि. मलजल विनाप्रक्रिया विर्सजित होत आहे ही वस्तुस्थिती आहे.

सदर मलजलावर प्रक्रिया करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) हरित लवादाने दिनांक ३०.०४.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेस निविदा प्रक्रियेबाबत पुढील कार्यवाही करणे शक्य होत नव्हते. यास्तव महानगरपालिकेने हरित लवादाच्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात सिव्हील अपील दाखल केले.

तसेच केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण मंत्रालयास हरित लवादाचे आदेश पुनर्विलोकीत करण्याबाबत कार्यवाही करण्याकरीता शासन स्तरावरुन पत्रव्यवहार करण्यात आला होता.

सदर प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने पुढील आदेशाच्या अधीन राहून निविदा प्रक्रिया सुरु ठेवण्याबाबत दिनांक १७.०५.२०१९ रोजी अंतरिम आदेश दिले आहेत. त्यानुषंगाने महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## हिंगोली नगरपालिकेने सुमारे ३०० घरकुलांच्या कामांना दिलेली मंजूरी

**(५) * १३७११६ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली नगरपालिकेने सुमारे ३०० घरकुलांच्या कामांना मंजूरी दिली असून यातील बहुतांश कामे सुरु झाली असली तरी अनेक लाभार्थ्यांना पहिला हप्ता अद्याप मिळालेला नाही व अनेक लाभार्थ्यांचे पुढील हप्ते मिळत नसल्याची बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घरकुलांच्या कामाची पुढील रक्कम अद्यापही त्यांना मिळाली नसल्यामुळे घरकुलांची कामे अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त लाभार्थ्यांना त्वरीत अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घटक क्रमांक ४ (BLC) खाली हिंगोली नगरपरिषदेच्या ३ प्रकल्पांतील अनुक्रमे २०० घरकुल, १५० घरकुल व ६०९ घरकुलांच्या प्रकल्पास केंद्रीय मान्यता व सनियंत्रणसमितीची

मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार राज्य शासनाच्या हिश्श्यातील पहिल्या हप्त्याचा निधी अनुक्रमे २०० घरकुलांसाठी रु.८० लाख, १५० घरकुलांसाठी रु.६० लाख व ६०९ घरकुलांसाठी रु.२४३.६० लाख इतका निधी दिनांक २९.०८.२०१८ व दिनांक ३०.०१.२०१९ रोजी हिंगोली नगरपरिषदेला वितरीत करण्यात आला आहे. तसेच १५० घरकुलांच्या प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या हिश्श्याचा पहिल्या हप्त्याचा रु.३५.४० लाख इतका निधी दिनांक ३०.०५.२०१९ रोजी हिंगोली नगरपरिषदेस वितरीत करण्यात आला आहे.

(३) व (४) घरकुल बांधकामाकरिता शासनाने उपलब्ध करून दिलेला निधी हिंगोली नगरपरिषदेस वितरीत करण्यात आला आहे. तसेच सदरचा निधी नगरपरिषदेने पात्र लाभार्थ्यांना वितरीत केलेला असून, घरकुलांची बांधकामे प्रगती पथावर आहेत. सदर प्रकल्पांकरिता वितरीत केलेल्या निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर दुसरा हप्त्याचा निधी वितरीत करण्यात येईल.

-----------------

## मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांना आर्थिक भरपाई देण्याबाबत

**(६) * १३७३५० श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांना आर्थिक भरपाई देण्याबाबत पुन्हा सर्व्हेक्षण करण्याचे आदेश एमएमआरडीए ने दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये बाधीत होणा-या मच्छिमारांचे योग्य पुनर्वसन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचा तपशील काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही, प्राधिकरणाकडे नव्याने प्राप्त झालेल्या मच्छिमारांच्या अर्जातील मच्छिमारांचे सर्वेक्षण करण्याबाबत सल्लागार नियुक्ती एप्रिल, २०१९ मध्ये करण्यात आलेली आहे. यामध्ये यापुर्वी झालेल्या सर्वेक्षणामध्ये सहभागी झालेल्या मच्छिमारांचे पुन्हा सर्वेक्षण अपेक्षित नाही.

(२) व (३) मुंबई पारबंदर प्रकल्पामुळे बाधितांसाठी स्वतंत्र नुकसान भरपाई धोरण तयार करण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाने दिनांक ८/१०/२०१५ च्या आदेशान्वये अतिरिक्त महानगर आयुक्त, याच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली असून सदर समितीने प्राधिकरणास सादर केलेल्या बाधित मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याच्या धोरणाच्या मसुद्यास दिनांक २३/१२/२०१५ रोजी अंतिम मान्यता प्रदान केली आहे. सदर समितीने ठरविलेल्या नुकसानीच्या प्रमाणात नुकसान भरपाई देण्यात येत आहे. एकूण ४२३४ बाधित मच्छिमारांपैकी पात्र २५६४ मच्छिमारांकरीता नुकसान भरपाईपोटी बँक ट्रान्सफर पध्दतीन्वये रु.४८.९३ कोटी आयुक्त, मत्स्यव्यवसाय (महाराष्ट्र) यांच्याकडे जमा केले आहेत. मत्स्यव्यवसाय विभागाकडून आतापर्यंत रु.४०.५९ कोटी इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आहे.

दरम्यानच्या काळात अनेक गावाकडील लोकांकडून प्राप्त झालेल्या १२००० अर्जांची छाननी करण्याकरीता प्राधिकरणाने एप्रिल, २०१९ मध्ये निविदेव्दारे मे.बिल्डिंग एन्वारोमेन्ट इंडिया प्रा.लि. या सल्लागाराची नियुक्ती केली असून, सदर कंपनीकडून छाननी प्रक्रीया प्रगतीपथावर आहे.

-----------------

## मुंबईतील मरोळ पाईप लाईन येथील न्यू टेक्निकल एरिया एसआरए प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(७) * १३५०२८ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मरोळ पाईप लाईन येथील न्यू टेक्निकल एरिया एसआरए प्रकल्प मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर एसआरए प्रकल्पातील झोपडीधारकांचे गत काही वर्षांचे घरभाडे थकीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पासाठी बांधण्यात आलेले संक्रमण शिबीर मोडकळीस आले असून त्यातील रहिवाश्यांचे जीव धोक्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत एसआरए प्राधिकरणाकडे वारंवार तक्रार करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रलंबित असलेला प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सदर योजनेतील पुनर्वसन इमारतीच्या आराखड्यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.१६.०८.२००६ रोजी मंजूरी दिलेली आहे. सदर जागेवर एकूण ४ पुनर्वसित इमारती असून त्यापैकी इमारत क्र.१ चे बांधकाम पुर्ण झालेले असून इमारत क्र.४ चे तळमजला+१२ मजले इतके आरसीसी बांधकाम पुर्ण झालेले आहे. इमारत क्र.१ ला अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(२) व (३) विकासकाकडून झोपडीधारकांचे भाडे थकीत असल्यास त्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र.१५३, १६६ व १५३अ नुसार झोपडीधारकास थकीत भाडे मिळवून देण्याची तरतुद आहे.

तथापि, प्रश्नांकित योजनेतील रहिवाश्यांनी थकीत भाडे मिळवून देण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे तक्रार केलेली नाही. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने संक्रमण शिबीरामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करुन स्ट्रक्चर्स स्टॅबिलीटी प्रमाणपत्र देण्याबाबत विकासकाला निर्देश देण्यात आले असल्याबाबत प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(४) व (५) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(२) अन्वये विकासक बदलण्याबाबत दि.३०.११.२०१८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांनी सुनावणी घेतली असून विकासकाविरुध्द कलम १३(२) अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेतील झोपडपट्टी पुनर्विकास गैरव्यवहाराबाबत

**(८) * १३८३६५ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेतील झोपडपट्टी पुनर्विकास गैरव्यवहाराचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने समाधानकारक न केल्याने याबाबतची तक्रार राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बी.एस.यु.पी. प्रकल्पांतर्गत महानगरपालिकेने ३३८ कोटी रुपये मंजूर केले असून १२५ इमारती बांधून १३००० झोपडीधारकांना घरे बांधून देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लाभार्थी निश्चित नसताना, जमिनी महानगरपालिकेच्या नावे नसताना नगररचना विभागाकडून परवानगी न घेता इमारती बांधण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गुन्हे दाखल होऊनही कोणत्याही अधिकाऱ्यास अटक झाली नसून मंजूर एफ.एस.आय.पेक्षा वाढीव एफ.एस.आय.चा वापर केला गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानूसार शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बी.एस.यु.पी. प्रकल्पामध्ये अपात्र लाभार्थ्यांचे पात्र लाभार्थी म्हणून बेकायदेशीरपणे दायित्व निर्माण करणे, पदाचा दुरुपयोग करून महानगरपालिकेचे नुकसान करणे तसेच इतर अनियमिततेबाबत श्री.कौस्तुभ गोखले यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती

त्याचप्रमाणे तक्रारदाराने राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे तक्रार केली, ही वस्तुस्थिती आहे.

(२) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियानाअंतर्गत बी.एस.यु.पी. योजनेमध्ये एकूण ४ प्रकल्प मंजूर करण्यात आले होते.

• सदर ४ प्रकल्पासाठी मंजूर रू. ६५४.४६ कोटीत १८४ इमारतीमध्ये एकूण १३,४६९ सदनिका बांधावयाच्या होत्या.

• उपरोक्त ४ प्रकल्पांपैकी प्रकल्प क्र.३ वेळेवर सुरू न झाल्याने व त्यास केंद्र शासनाने मुदतवाढ न दिल्याने रद्द करण्यात आला.

• उर्वरित ३ प्रकल्पांमध्ये सदनिकांची संख्या सिमीत करून एकूण ७,२७२ सदनिकांचे बांधकाम प्रत्यक्ष सुरू केले. त्यापैकी २,४६४ सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले.

• अपूर्ण असलेल्या ४८०८ सदनिकांचे बांधकाम ऑगस्ट, २०१९ अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

• बांधकाम पूर्ण असलेल्या २४६४ सदनिकांपैकी १,४७८ सदनिकांचे पात्र लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले असून ९८६ सदनिका शिल्लक आहेत.

• केंद्र शासनाच्या धोरणानुसार बी.एस.यु.पी. योजना दि. ३१.०३.२०१७ पासून संपुष्टात आली असून प्रधानमंत्री आवास योजना कार्यान्वित झालेली आहे.

• बी.एस.यु.पी मधील ३,००० पूर्ण होणाऱ्या सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेकरीता हस्तांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) • बी.एस.यु.पी. प्रकल्प राबविण्यात आलेली जमीन राज्य शासन, तत्कालीन डोंबिवली नगरपरिषद, म्हाडा व खाजगी मालकीची होती.

• लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अहवालानुसार सदर प्रकल्पासाठी नगररचना विभागाची परवानगी घेतली नव्हती, ही वस्तुस्थिती आहे.

(४) व (५) • श्री.कौस्तुभ गोखले यांच्या तक्रारीच्या चौकशीत संबंधितानी अपराध केल्याचे निष्पन्न झाल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे ३ अधिकारी व २ खाजगी इसम अशा एकूण ५ व्यक्तींवर बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिष्टर क्र.६०/२०१६ नोंदविला आहे.

• महानगरपालिकेच्या ३ अधिकाऱ्यांपैकी २ अधिकाऱ्यांविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोप दाखल करण्यास मंजुरी देण्यात आली असून, एका अधिकाऱ्याविरुद्ध सुधारित मंजुरी देण्याची कार्यवाही सुरू आहे.

• सदर योजनेसाठी केंद्र शासनाने २.५ एफ. एस. आय. मंजूर केला होता. सदर एफ. एस. आय. च्या मर्यादेतच बांधकाम झाल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील नागरी सुविधा केंद्रे बंद असल्याबाबत

**(९) * १३७७८६ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात विविध सेवा एकाच ठिकाणी मिळाव्यात यासाठी १५० नागरी सुविधा केंद्रे (किऑक्स) महानगरपालिकेने सुरु केली असल्याचे माहे जानेवारी, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १५० नागरी सुविधा केंद्रांपैकी ११० केंद्र बंद अवस्थेत असून कंत्राटदार वंश इन्फोटेक कंपनीकडून चालविण्यात येत असलेल्या नागरी सुविधा केंद्राबाबत नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी असून केंद्राची मुदत महिन्यात संपुष्टात आली असल्याने पुन्हा त्याच कंपनीबरोबर करार करू नये अशी मागणी नागरीकांडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सुविधा केंद्राबाबत नागरिकांच्या असंख्य तक्रारी असल्याने महानगरपालिकेने संबधित कंत्राटदाराला नोटीस देऊन करार संपुष्टात आणणे आवश्यक असताना कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुणे शहरातील नागरी सुविधा केंद्रे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) • पुणे महानगरपालिकेच्या सेवासुविधा शहरातील नागरीकांना उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर १५० बहुउद्देशीय नागरी सेवा केंद्रे (किऑस्क केंद्रे) उभारणीकरीता दि.१२.१२.२००६ रोजी मे.वंश इन्फोटेक प्रा.लि. यांना निविदा प्रक्रियेद्वारे कार्यादेश देण्यात आले होते.

• डिसेंबर, २०१२ पर्यंत एकूण ७५ किऑस्क केंद्रांची उभारणी करण्यात आली होती. त्यातील २२ केंद्रे विविध विकासकामे, रस्ता रुंदीकरण, वाहतुकीस होणारा अडथळा, भुयारी मार्गाचे कामकाज इ. कारणांसाठी बंद करण्यात आली होती.

• या प्रकरणी सजग नागरी मंच ही संस्था तसेच नागरीकांकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

• त्यास अनुसरुन तपासणी केली असता निविदेतील अटी, शर्तींनुसार सदर कंपनीचे कामकाज असमाधानकारक असल्यामुळे कंत्राटदारासोबतचा करारनामा दि. २१.११.२०१६ रोजी कायदेशीर नोटीस बजावून संपुष्टात आणला असून डिसेंबर, २०१६ पासून किऑस्क प्रकल्प पूर्णत: बंद केलेला आहे.

• सद्य:स्थितीत ऑनलाईन पध्दतीस नागरीकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असल्याने त्यांना सुलभरित्या कर आकारणीकरीता विविध ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कामठी नगरपरिषद (जि.नागपूर) येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना घरकुल मिळणेबाबत

**(१०) * १३५४७५ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामठी नगरपरिषद (जि.नागपूर) येथील प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नागरीकांना घरकुल मिळाले नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामठी नगरपरिषदेमध्ये १८०० पात्र घरकुल लाभार्थी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामठी नगरपरिषदेचे संबंधित अधिकारी श्री.भोकरे व इतर कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे प्रधानमंत्री आवास योजना अपयशी ठरली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १८०० लाभार्थ्यांना तात्काळ घरकुल मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) कामठी नगरपरिषद क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत घटक क्रमांक ४ खालील एकूण ३ सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजूर झाले आहेत. त्यातील एकूण अर्जदारांची संख्या १०७७ होती.

(३) १०७७ अर्जदारांचे (DPR) मंजूर झाले असले तरी त्यापैकी केवळ २७० अर्जदार पात्र ठरले. DPR सादर करताना अर्जदारांची पात्रता तपासणे आवश्यक असताना याबाबत दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.

(४) कामठी नगरपरिषद नागरी क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत घटक क्र. ४ खालील एकूण ३ सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजूर झाले आहेत. त्यातील एकूण अर्जदारांची संख्या १०७७ आहे. त्यापैकी २७० अर्ज पात्र ठरले तर उर्वरित ८०७ अर्जदारांकडे स्वमालकीची जमीन नसल्यामुळे त्यांना घटक क्र. ४ अंतर्गत सदर योजनेचा लाभ देता येत नाही. जे अर्जदार २०११ पुर्वी पासून शासकीय जमीनीवर अतिक्रमण करुन रहात

आहेत, अशा अर्जदारांना त्यांनी याबाबतचे पुरावे सादर केल्यानंतर जमीनीचे पट्टे वाटप करण्याच्या दृष्टीने जमीन मोजणीचा प्रस्ताव  भूमी अभिलेख कार्यालयाकडे सादर करण्यात येत आहे. अद्यापपर्यंत ५७८ अर्जदारांचे प्रस्ताव उक्त कार्यालयाकडे सादर करण्यात आलेले आहेत.

तथापि, DPR सादर करताना अर्जदारांची पात्रता तपासली गेली नसल्याचे निर्दशनास आले आहे.  DPR तयार करण्याचे काम करणाऱ्या हरिओम नवोदय बहुउद्देशीय संस्थेने याकामात हलगर्जीपणा केला आहे. त्यामुळे सदर संस्थेचे देयक अदा केलेले नाही.  सदर प्रकरणास जबाबदार असणाऱ्या  हरिओम नवोदय बहुउद्देशीय संस्था तसेच नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन दोषींवर कारवाई  नगर विकास विभागामार्फत करण्यात येईल. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नगर विकास विभागामार्फत विधानमंडळास सादर करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील तलावातील जलपर्णी काढण्याबाबतच्या निविदांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(११) * १४२३२६ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या वतीने तलावात जलपर्णी नसतानाही जलपर्णी काढण्याबाबतची एकूण २३ कोटी रुपयांची बनावट निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील कात्रज व पाषाण येथे ३ तलावातील जलपर्णी काढण्याची निविदा मंजूर होण्याआधीच ठेकेदारांना काम करण्याचे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बनावट जलपर्णी काढण्याच्या कामात महानगरपालिकेचे अधिकारी आणि संबंधित ठेकेदार यांनी संगनमताने निविदा काढून आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी चौकशीची मागणी नगरसेवक, स्थानिक नागरिक, संघटना यांनी एसीबी गुन्हे अन्वेषण शाखेकडे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बनावट जलपर्णी निविदा प्रकरणातील महानगरपालिका अधिकाऱ्यांची चौकशी करण्यासाठी गुन्हे अन्वेषण विभागाने महानगरपालिकेकडे लेखी पत्राद्वारे परवानगी मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोट्यवधी रुपयांची बनावट जलपर्णी निविदा प्रकरणातील पुणे महानगरपालिकेतील दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • पुणे महानगरपालिका हद्दीतील मुळा व मुठा या नद्या तसेच कार्यक्षेत्रातील एकूण ३ तलावांमध्ये जलपर्णीचा प्रादुर्भाव झाल्याचे निदर्शनास आल्याने, जलपर्णी काढण्यासाठी ३ वर्ष मुदतीकरीता दि. ०२.०१.२०१९ रोजी एकूण चार निविदा काढल्या होत्या, ही वस्तुस्थिती आहे.

• तसेच या कामाचे कार्यादेशच देण्यात आले नव्हते, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३), (४) व (५) • या प्रकरणी स्थानिक नगरसेवकांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांना पत्र दिले असुन त्याची प्रत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे सादर केली आहे.

• सदर पत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राप्त झाले असून त्या अनुषंगाने उचित कार्यवाही सुरू आहे.

• तसेच स्थानिक नागरिकांनी शिवाजीनगर पोलीस ठाणे, पुणे येथे तक्रार दाखल केलेली होती, हे खरे आहे.

• सदर निविदेतील दर बाजार भावापेक्षा जास्त असल्याने निविदा रद्द करण्यात आली असून संबंधीत ठेकेदारास कोणतीही रक्कम अदा केलेली नाही. तसेच पुणे महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एमआयजी क्लब व्यवस्थापनाने (वांद्रे, मुंबई) म्हाडासोबत झालेल्या कराराचे उल्लंघन केल्याबाबत

**(१२) * १३५८६९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमआयजी क्लब (वांद्रे, मुंबई) व्यवस्थापनाने सन २००४ मध्ये म्हाडा बरोबर झालेल्या करारातील ३ (ब) नुसार शाळेची इमारत विनामुल्य बांधून देण्याच्या अटीचे उल्लंघन केल्याप्रकरणी म्हाडाने व्यवस्थापनास ५३ कोटी ६५ लाख रुपये दंड रक्कम भरण्याबाबत दिनांक २८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास नोटीस बजावली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त एमआयजी क्लब व्यवस्थापनाने करारातील अटींचे उल्लंघन केल्याप्रकरणी व नोटीशीला उत्तर दिले नसल्यामुळे करार रद्द करुन क्लबची जागा त्वरीत ताब्यात घेण्याबाबत म्हाडातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, शासन व म्हाडाने सदर प्रकरणी कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच किती कालावधीत क्लबचा भूखंड शासनाच्या ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) एम. आय. जी. क्रिकेट क्लब यांनी दि. २१.०५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये माध्यमिक शाळेच्या इमारतीतील बांधकाम खर्च व दंडकरिता दिलेली नोटीस रद्द करणेबाबत म्हाडास कळविले आहे. एम. आय. जी. क्रिकेट क्लब यांनी उत्तर दिले असल्याने दिलेल्या उत्तराची तपासणी करुन पुढील कार्यवाही म्हाडाकडून करण्यात येत आहे असे म्हाडाने शासनास कळविले आहे.

-----------------

# अकोला महानगरपालिका क्षेत्रातील ६० हजार कुटुंबे घरकुलाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(१३) * १३८५१३ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिका क्षेत्रात गत दोन वर्षापूर्वी प्रधानमंत्री घरकुल योजना सुरु करण्यात आली होती त्यामुळे ६५ हजार बेघर कुटुंबांनी महानगरपालिका प्रशासनाकडे अर्ज दाखल केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५ हजार ६७२ अर्ज मंजुर करण्यात आले व त्यातील फक्त २१० घरकुले पूर्ण झाली आहेत, अद्यापपर्यंत सुमारे ६० हजार कुटुंब घरकुलाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ च्या तिस-या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित अर्जदारांना घरकुल देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. हे खरे आहे.

(२), (३) व (४) • प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीसाठी अकोला महानगरपालिका क्षेत्रात, २१४ वस्त्या निश्चीत करण्यात आलेल्या आहेत.

• यासाठी महानगरपालिकेकडे आतापर्यंत ६७,२१० इतके अर्ज प्राप्त झाले आहेत.

• प्राप्त अर्जापैकी अंदाजे ४९,५४९ अर्ज प्रथमदर्शनी पात्र ठरले आहेत.

• उर्वरित अर्जाची पडताळणी सुरु आहे.

• घटक-०१ "झोपड्यांचा आहे तेथेच पुनर्विकास करणे" या घटकासाठी ८४८२ अर्जदार पात्र ठरले. त्यापैकी २४४ घरकुलांसाठी जागा उपलब्ध असल्याने, त्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर केला आहे. तर ७९२ घरकुलांसाठीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात येत आहे.

उर्वरित ७५४६ अर्जदारांच्या संदर्भात दिनांक १७/११/२०१८ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही सुरु आहे.

• घटक-०२ “कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे” या घटकातंर्गत प्रथमदर्शनी पात्र ५१९ अर्जावर बँकामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

• घटक-०३ “खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे” या घटकांतर्गत प्रथमदर्शनी पात्र १६,५१८ अर्जांसाठी, खाजगी विकासकांमार्फत परवडणाऱ्या घरांच्या प्राप्त ०५ प्रस्तावांपैकी ०४ (१०९२ घरांसाठी) प्रस्ताव नगररचना विभागाकडून मंजूर असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.

• घटक-०४ “आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरुपातील घरकुल” या घटकांतर्गत प्रथमदर्शनी पात्र २४,०३० अर्जदारांपैकी, ५५६२ घरकुलांसाठीच्या ९ प्रकल्प अहवालास केंद्रीय तसेच सनियंत्रण समितीची मान्यता झाली आहे. यापैकी ९१८ लाभार्थ्यास इरादा पत्र दिले आहे. तर, यासाठी सुरु करण्यात आलेल्या ५४२ घरांपैकी ३४२ घरांचे काम पूर्ण झाले आहे.

-----------------

## पालम नगरपंचायती अंतर्गत (जि.परभणी) मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१४) * १४२३७९ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालम नगरपंचायतींतर्गत (जि.परभणी) सन २०१६ ते २०१८ या कालावधीमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या नगरसेवक व अधिकारी यांचेवर गुन्हा दाखल करुन चौकशी करावी अशी मागणी माजी वि.स.स. श्री सिताराम घनदाट यांनी मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे दिनांक १६ मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायतीच्या गैरव्यवहाराची चौकशी करून कारवाई करण्याच्या मागणीसाठी स्थानिक नागरिकांनी दिनांक १७ जानेवारी, २०१९ रोजी पासून तहसिल कार्यालयासमोर उपोषण/आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने दोषींवर गुन्हा दाखल करुन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अशा आशयाची तक्रार माजी विधानसभा सदस्य यांच्याकडून विभागास प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. यासंदर्भात जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली आहे.
• जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे प्राप्त तक्रार व उपोषणाच्या अनुषंगाने, तक्रारीतील मुद्यांची चौकशी करण्यासाठी, त्यांनी उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती स्थापन केली आहे.
(३) सदर चौकशी अहवाल एका महिन्याच्या कालावधीत सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, परभणी यांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण व डोंबिवली (जि.ठाणे) या दोन्ही शहरातील १२ रस्ते राष्ट्रीय व राज्य महामार्गाला जोडण्याबाबत

**(१५) * १३५६२३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण व डोंबिवली या दोन्ही शहरांतील १२ रस्ते राष्ट्रीय व राज्य महामार्गाला जोडण्याबाबतचा अहवाल एमएमआरडीए ने तयार केला असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्तेजोडणीच्या कामाकरिता किती रक्कमेची तरतूद शासनाकडून करण्यात आली वा येत आहे, तसेच सदर रस्तेजोडणीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३), (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर कामाकरीता सन २०१९-२०२० मध्ये रु.३८.०० कोटी रक्कमेची अर्थसंकल्पीय तरतुद केली आहे. सद्य:स्थितीत प्राधिकरणामार्फत कंत्राटदार नेमणुकीसाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर कंत्राटदार निश्चित करून कार्यारंभ आदेश दिल्यानंतर सदर कामे १८ महिने (पावसाळ्यासहित) या कालावधीत पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## बुलढाणा येथील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करुन हनवतखेड येथील डम्पिंग ग्राऊंड इतरत्र स्थलांतरित करणेबाबत

**(१६) * १३५१७८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा नगरपरिषद यांना शहरातील घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने ४.३५ कोटी रुपयांचे अनुदान सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निधी प्राप्त होऊन देखील बुलढाणा शहरात नगरपरिषदेने घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याने शहरात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हनवतखेड (ता.जि.बुलढाणा) येथील ग्रामस्थांनी आरोग्याचे गंभीर कारण पुढे करत येथील डम्पिंग ग्राऊंड अन्यत्र स्थलांतरीत करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानूसार बुलढाणा शहरातील घाणीचे साम्राज्य दूर करुन हनवत खेडा येथील ग्रामस्थांचा आरोग्याचा प्रश्न विचारात घेता सदर डम्पिंग ग्राऊंड अन्यत्र स्थलांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) • बुलढाणा नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या रूपये ४.५३७२ कोटी किंमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

• केंद्र व राज्य शासनाच्या निधीचा पहिला हप्ता म्हणून रूपये १.३२ कोटी एवढा निधी बुलढाणा नगरपरिषदेस वितरीत करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

• घनकचरा व्यवस्थापनाच्या मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालातील घटकांची अंमलबजावणी सुरू असून शहरातील घनकचरा संकलनासाठी आवश्यक असलेल्या २५ घंटागाड्यांची जेम (GEM) पोर्टलवरून खरेदी केली आहे व घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेली स्थापत्य कामे सुरू आहेत.

• शहरातील घनकचरा संकलीत केला जात असल्याचे बुलढाणा नगरपरिषदेने कळविले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार, हनवतखेड येथील डंम्पिंग ग्राऊंडवर साठलेल्या जुन्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्यात येणार असून किमान ८० टक्के जागा रिकामी करून घेण्यात येणार आहे.

तसेच, यापुढे शहरातील घनकचऱ्यावरचे डम्पिंग न करता त्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील श्रीराम अर्बन क्रेडीट को ऑपरेटिव्ह सोसायटीच्या अध्यक्षांनी केलेला गैरव्यवहार

**(१७) * १४२२०२ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील श्रीराम अर्बन क्रेडीट को ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये अनेक लोकांनी कोट्यवधी रुपयांची गुतंवणूक केली असून सोसायटीचे अध्यक्ष श्री.खेमचंद मेहरकुरे यांनी करोडो रूपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी त्यांच्या नंदनवन, शिवनगर येथील घराला १५० ते २०० खातेदारांनी दिनांक १८ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेराव घालुन घोषणा दिल्याचे दिनांक १ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सोसायटीच्या अध्यक्षांनी करोडो रूपयांचा अपहार करून शहरामध्ये मोठ्या प्रमाणात जमीनींची खरेदी केली असल्याचा आरोप गुतंवणूकदारांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले आहे व तद्नुसार संबंधीत दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच गुंतवणूकदारांचे संपुर्ण पैसे त्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) होय.

(३) संस्थेच्या ठेवीदार, सभासदांनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने संस्थेचे सन २०१५-१६, २०१६-१७ व सन २०१७-१८ या कालावधीचे फेरलेखापरीक्षण करण्यासाठी दिनांक ५/४/२०१९ रोजीच्या आदेशान्वये विशेष लेखापरिक्षक, वर्ग-२ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संस्थेच्या सन २०१७-१८ या कालावधीच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये नमुद केल्या नुसार संस्थेची ज्या बँकांमध्ये खाती आहेत ती सर्व बँक खाती गोठविण्याबाबत संबंधित बँकांना कळविण्यांत आलेले आहे.

संस्थेच्या नावाने असलेली मालमत्ता तसेच संस्थचे अध्यक्ष/ उपाध्यक्ष/सचिव/व्यवस्थापक यांचे नावे आलेल्या वैयक्तिक मालमत्तेचे हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करणेबाबत जिल्हाधिकारी, नागपूर, सहजिल्हा निबंधक (मुद्रांक) जिल्हाधिकारी नागपूर व सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर परिसरात रेतीमाफीयाकडून महसूल अधिकाऱ्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याबाबत

**(१८) * १३७३३० श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने वाठोडा रिंग रोड परिसरात दिनांक २३ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास ६ ब्रास रेती असलेले दोन ट्रक पकडले, ही कारवाई सुरू असतांनाच या रेतीमाफीयांनी अधिकाऱ्यांच्या पथकावर मर्सीडीज गाडी नेऊन दोनदा जिवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याची माहिती दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध गौण खनिज प्रकरणी वापरण्यात आलेल्या ट्रक क्र.एमएच ४०-एके ८०५६, ट्रक क्र. एमएच ३६ एफ ४१५७, मर्सिडीज गाडी क्र.एमएच ४१ एए ८१०० या गाड्याच्या क्रमांकासहीत या गंभीर प्रकरणाची महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार देऊन सुध्दा संबंधित आरोपींवर पोलीस विभागाने अद्यापही कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. अवैध गौण खनिज प्रकरणी वापरण्यात आलेले ट्रक क्र.एमएच-४०-एके-८०५६ व एमएच-३६-एफ-४१५७ असे दोन ट्रक व मर्सिडीज गाडी क्र.एमएच-४१-एए-८१०० अशा गाड्यांच्या क्रमांकासहीत या गंभीर प्रकरणाची महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाचे नंदनवन पोलीस स्टेशन येथे अपराध क्र.३२५/१९ कलम ३५३, ३४, ३०७, ३७९,१२०ब,१५२, ५०४, ५०६, १०९ भादंवि सहक.२१ (१)(२) माईन्स एण्ड मिनरल ॲक्ट,१९५७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात

आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये नमूद ट्रक जप्त करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यातील दोन आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरात महानगरपालिकेच्या वतीने साकारण्यात आलेल्या वाहतूक बेटांची झालेली दुरवस्था

**(१९) * १३७३१९ डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहराच्या सौंदर्यीकरणात भर टाकण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने लाखो रुपये खर्च करून वाहतूक बेटे साकारण्यात आलेली आहेत मात्र या वाहतूक बेटांची दुरवस्था झाल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतूक बेटांची दुरुस्ती करण्याबाबत वारंवार नागरिकांनी मागणी करूनही महानगरपालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बेटांची दुरुस्ती व नुतनीकरणाबाबत महानगरपालिकाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

• नाशिक महानगरपालिकेमार्फत "कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी फंडींग" (सी.एस.आर.) अंतर्गत शहरातील वाहतूक बेटे / रस्ता दुभाजक सुशोभिकरण व दुरुस्ती देखभाल करण्यासाठी प्रायोजक संस्थांकडे १० वर्षांसाठी करारनामा करुन देण्यात आलेले आहेत.

• याप्रकारे २५ ठिकाणी वाहतूक बेटे व २२ ठिकाणी रस्ता दुभाजक सी.एस.आर. अंतर्गत विकसित करण्यात आले आहेत.

• याकरिताचा खर्च हा महानगरपालिकेमार्फत करण्यात आला नसून प्रायोजकामार्फत करण्यात येतो.

• सदर वाहतूक बेटांची दुरवस्था झालेली नाही.

• तसेच वाहतूक बेटांची देखभाल व दुरुस्तीबाबत प्रायोजक संस्थेकडून दुर्लक्ष झाल्याचे आढळून आल्यास संबंधितांना महानगरपालिकेमार्फत नोटीस देऊन वाहतूक बेटांची दुरुस्ती करण्यात येते.

(२) वाहतुक बेटे दुरुस्ती करण्यासंदर्भात नागरीकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत, असे नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रायोजक संस्थांकडून सदर वाहतूक बेटे व रस्ता दुभाजकांची वेळोवेळी दुरुस्ती व नुतनीकरण करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा, वागळे इस्टेट येथील रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या लोकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(२०) * १३५९४४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा येथील रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या लोकांचे त्वरीत पुनर्वसन न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना दिनांक २४ डिसेंबर, २०१८ रोजी तसेच वारंवार दिलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाधितांचे पुनर्वसन झाल्याशिवाय बांधकामे न तोडण्याचे मा.न्यायालयाचे आदेश असतांनाही मार्च, २०१९ मध्ये वागळे इस्टेट कामगार हॉस्पीटल रस्त्यालगत व इतर ठिकाणी रस्ता रुंदीकरणामध्ये रहिवाशांची घरे पाडलेली असुन बाधितांचे पुनर्वसन न करताच अनेकांना बेघर केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच मुंब्रा व महानगरपालिका क्षेत्रातील बाधितांच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा करण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, असे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) ठाणे महानगरपालिकेने खालील माहिती उपलब्ध केली आहे :-

• वागळे इस्टेट येथे रस्ता रुंदकरणाच्यावेळी बाधित विकास आराखड्यानुसार वागळे इस्टेट ते मराठा हॉटेल येथील रस्ता रुंदीकरणाच्या मोहिमेत बाधित १८८ संरचनापैकी २३ बाधितांची पर्यायी व्यवस्था केली आहे. उर्वरित बाधितांचे पात्रता तपासून पुनर्वसनाची प्रक्रिया ठाणे महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

• वागळे इस्टेट रस्ता क्र.१६ मधील रस्ता रुंदीकरणात बाधित १९ संरचना बाबत पात्रता तपासून पुनर्वसनाची प्रक्रिया सुरु असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• बाधितांचे पुनर्वसन बी.एस.यु.पी. या योजनेंतर्गत करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील मेड्रिटिना हॉस्पीटलचे संचालकांनी राजीव गांधी जीवनदायी योजनेतंर्गत केलेला अपहार

**(२१) * १३९९०९ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील सेंट्रल बाजार रोड येथील मेड्रिटिना हॉस्पीटलचे संचालक व त्यांच्या सहका-यांनी राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत चार कोटी रूपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची तक्रार हॉस्पीटलचे आर्थिक सल्लागार यांनी आर्थिक गुन्हे शाखेकडे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली असता त्यांनी त्यावेळी या प्रकरणावर कोणतीही कायदेशीर कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हॉस्पीटलचे संचालक व त्यांचे सहकारी राजीव गांधी जीवनदायी योजनेची आर्थिक वसुली अवैध पध्दतीने रुग्णांच्या कुटूंबियांकडुन करित होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गैरकाराभाराची उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार मेड्रिटिना हॉस्पीटलचे संचालक व त्यांच्या सहका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) जुलै, २०१८ मध्ये आर्थिक गुन्हे शाखेकडे याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. आर्थिक गुन्हे शाखा याप्रकरणाची चौकशी करीत होती.

(३) व (४) सिताबर्डी पोलीस स्टेशन नागपूर शहर येथे दिनांक २० जानेवारी, २०१९ रोजी अपराध क्रमांक १९/२०१९ भा.द.वि. कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०ब, ३४ अन्वये एका आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईमधील विक्रोळी (पुर्व) कन्नमवार नगर, टागोर नगर येथील म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(२२) * १३८३७८ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील विक्रोळी (पुर्व) कन्नमवार नगर, टागोर नगर येथील म्हाडा वसाहतीमधील इमारती या ५० ते ६० वर्षापूर्वीच्या असून सध्या या इमारती धोकादायक स्थितीत असून या वसाहतीमधील इमारतींच्या पुनर्विकासाचा

प्रश्न गंभीर झाला असल्याने म्हाडामार्फत या वसाहतीचा एकत्रित (बीडीडी चाळींच्या धर्तीवर) पुनर्विकास प्रकल्प राबवून सदर प्रकल्पात सुसज्य व अद्ययावत असे रूग्णालय, व्यायाम शाळा, उद्यान, मीनी थिएटर, सभागृह आणि शाळा इत्यादी सुविधा पुरविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकत्रित पुनर्विकास प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) इमारतीचे पुर्नविकास करण्याकरीता संबंधित इमारतीचे संस्थेकडून संमती पत्र प्राप्त होणे आवश्यक आहे. सदर संमतीपत्र प्राप्त झाल्यास प्रस्तावित इमारतींचे पुनर्विकासाचे काम हाती घेणे शक्य होईल असे म्हाडाने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये काम करित असलेल्या कामगारांच्या सुरक्षिततेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत

**(२३) * १३५०६५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये काम करित असलेल्या कामगारांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी यंत्रणा तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना उभारण्याकडे कारखानदारांचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना नसल्यामुळे सन २०१५-२०१६, २०१६-२०१७, २०१७-२०१८ या वर्षात कारखान्यांमध्ये स्फोट होवून, आग लागून व वायु गळतीच्या विविध दुर्घटनांमध्ये किती कामगार मृत्युमुखी पडले असून किती गंभीर जखमी अथवा किरकोळ जखमी झाले आहेत,

(३) असल्यास, संबंधित विभागाच्या दुर्लक्षपणामुळेच कारखानदारांनी कामगारांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना न केल्यामुळे कामगार मृत्यूमुखी अथवा गंभीर जखमी होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे :** (१) व (२) सन २०१५ ते २०१८ या कालावधीत - १९ कारखान्यांत आग लागण्याच्या घटनांमध्ये - १२ कामगार मृत व ५ कामगार जखमी झाले, ३ कारखान्यांमध्ये स्फोटांच्या घटनांमध्ये - ४ कामगार जखमी झाले, व १६ कारखान्यांतील इतर दुर्घटनांमध्ये - १८ कामगार मृत व १ कामगार जखमी झाला. तसेच या कालावधीत वायु गळतीची घटना घडलेली नाही.

(३) (४) व (५) वरील सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात आलेली असून गंभीर नियमभंग आढळलेल्या प्रकरणांमध्ये कारखान्यांच्या व्यवस्थापनाविरुद्ध खटले दाखल केले आहेत. तसेच कमी गंभीर प्रकरणांमध्ये सुरक्षा उपाययोजनांची पूर्तता करुन घेऊन कारखानदारांना व व्यवस्थापकांना ताकीद देण्यात आली आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात अधिका-यांकडून दुर्लक्ष झालेले नाही. त्यामुळे या प्रकरणी विलंब झालेला नाही,

-----------------

## माथाडी कामगार पतसंस्थेला कामगारांचे कर्जाचे हप्ते त्यांच्या पगारातून वजा करण्यास मनाई करण्यात आल्याबाबत

**(२४) * १३९८३५ श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथाडी कामगारांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी माथाडी सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात आली असून, माथाडी कामगारांना लागणारी कर्जे या संस्थांमधून दिल्यानंतर त्याचे हप्ते माथाडी बोर्डाच्या सहमतीने गत ५० वर्षापासून त्यांच्या वेतनातून कापून घेतले जात होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथाडी कामगार पतसंस्थेला माथाडी कामगारांचे कर्जाचे हप्ते वेतनातून कापण्यास शासनाने दिनांक ५ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मनाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या या निर्णयामुळे माथाडी कामगारांसह संबंधित पतसंस्था, मध्यवर्ती जिल्हा बँका, अडचणीत येणार असून यापुढे माथाडी कामगारांना पतसंस्थेकडून कर्ज मिळणार नसल्यामुळे कामगार आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयाच्या विरोधात माथाडी कामगार संघटनांनी राज्यव्यापी बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उपरोक्त शासन निर्णय रद्द करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे :** (१) राज्यातील ३६ माथाडी मंडळांपैकी २२ माथाडी मंडळाच्या कामगारांच्या मासिक पगारातून पतसंस्थाकडे कपातीच्या रकमेचा भरणा करावा अशा प्रकारे मागणी पत्र मागील अनेक वर्षापासून विविध पतसंस्थाकडून होत होते व या पध्दतीने माथाडी कामगारांच्या पगारातून मोठया प्रमाणावर कपात करुन रकमा पतसंस्थाना मंडळाकडून देण्यात येत होत्या, हे खरे आहे.

(२) मंडळाकडून करण्यात येत असलेली कपात कायदा व नियमानुसार योग्य आहे अथवा कसे याबाबत राज्याच्या विधी व न्याय विभागाकडे मागितले असता, महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ मधील तरतुदीनुसार माथाडी मंडळे ही मालक किंवा मुळ मालक या संज्ञेत मोडत नसल्यामुळे माथाडी मंडळामार्फत माथाडी कामगारांच्या वेतनातून कर्जाची अथवा कर्जाच्या हप्त्याची कपात न करण्याबाबतचा सल्ला त्यांनी दिला. त्यानुसार शासन निर्णय दि.०५.०३.२०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

(३) अशा आशयाच्या तक्रारी माथाडी कामगार संघटनांकडून प्राप्त झालेल्या आहेत.

(४) याबाबत माथाडी कामगार संघटनांची निवदने प्राप्त झालेली आहेत.

(५) माथाडी मंडळाच्या कामकाजाबाबत शासनामार्फत एक सदस्यीस समिती स्थापन करुन चौकशी केली असता, तसेच शासनाच्या असे निदर्शनास आले की, माथाडी कामगारांना दिलेल्या कर्जाच्या रकमांचा तपशील, व्याजाचा दर, तारणांची माहिती, कर्जासाठीची पात्रता, त्याबाबतची मर्यादा, हमी तसेच कर्जाच्या परतफेडीचा कालावधी व व्याजाचा दर ही मूलभूत माहितीदेखील कोणत्याही मंडळास कोणत्याही पतसंस्थेकडून उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे कोणत्याही माहितीशिवाय व अधिकार नसताना करण्यात येत असलेली बेकायदेशीर कपात थांबविण्याचा निर्णय विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने शासनाने दि.०५.०३.२०१९ रोजी घेतला आहे. दि.०५.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयाविरुध्द काही पतसंस्थांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केल्या असून सद्यस्थितीत हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# पुणे बी.आर.टी.मार्ग-सातारा रस्त्यावरील रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२५) * १३५६५३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे बी.आर.टी.मार्ग-सातारा रस्त्यावरील रस्त्याच्या कामात अनेक त्रुटी असून बहुतांश कामे ही अपूर्ण आणि निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या कोट्यवधींच्या खर्चाच्या निकृष्ट कामांची चौकशी सर्व स्तरावरून लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्थांकडून होत असतांना अद्यापही संबंधित प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या कामांसाठी महानगरपालिकेकडून अनुक्रमे १०८ कोटी, १८ कोटी आणि २२ कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध केली असून पदपथ, बसथांबे यासह विविध विकासकामे करण्याच्या कामांमध्ये संबंधित कामाचे ठेकेदार आणि कन्सलटंट, अधिकारी यांच्या माध्यमातून संगनमताने गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित प्रशासनाच्या वतीने कोणतीही कार्यवाही होत नसल्याने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पुणे-सातारा बीआरटी रस्ता व सायकल ट्रॅक विकसित करणे या कामांच्या चौकशीबाबत दै.महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये बातमी आलेली असून स्थानिक नगरसेवक तसेच स्थानिक विधानसभा सदस्यांनी पत्रे दिलेली होती, हे खरे आहे.

सदर कामाची व बांधकाम साहित्याची गुणवत्ता तपासण्यासाठी खालील उपाययोजना करत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे :

• मे.पेव्हटेक कन्सल्टन्ट या तज्ञ सल्लागार कंपनीमार्फत सदर कामाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात येते.

• तसेच निविदा अटी शर्तीनुसार १० % कामाच्या दर्जाची व बांधकाम साहित्याची तपासणी त्रयस्थ प्रयोगशाळेमार्फत करण्यात येते.

• त्रयस्थ प्रयोगशाळेच्या अहवालानुसार बांधकाम साहित्य व प्रत्यक्ष कामाची गुणवत्ता योग्य असल्याचे निश्चित केले आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• प्रत्यक्ष कामाच्या जागेवर गुणवत्ता तपासणी लॅबोरेटरी उभारण्यात आलेली असून त्याद्वारे कॉंक्रिटची क्षमता, इतर बांधकाम साहित्याची क्षमता तपासण्याचे काम तज्ञ सल्लागार कंपनीमार्फत करण्यात येते.

• कामाच्या दर्जाबाबत खात्री केल्यानंतरच संबंधित कंत्राटदारांना बिल अदा करण्यात येते.

(३) • प्रस्तुत प्रकल्पाकरीता निविदा क्र.२६५-२०१६ करीता रु.७४.५४ कोटी इतक्या रकमेच्या पूर्वगणन पत्रकातील कामाकरीता ठेकेदारास दि.०२.०१.२०१७ रोजी कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

• जागेवरील काम पूर्ण झाल्यानंतर रू.२८.९९ कोटीच्या वाढीव कामांसाठी निविदा प्रक्रीया पूर्ण करून दि.०८.०३.२०१९ रोजी कामाचे कार्यादेश देण्यात आले आहे.

• निविदा अटी शर्तीनुसार बांधकाम साहित्य व प्रत्यक्ष कामाचा दर्जा यांची तपासणी करुनच ठेकेदारास बिल अदा करण्यात येते.

• तसेच या प्रकल्पाचे सेफ्टी ऑडीट आय.आय.टी. पवई यांच्याकडून करण्याकरीता पुणे महानगरपालिकेकडून कार्यवाही सुरु आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) या प्रकरणी स्थानिक विधानसभा सदस्यांनी शासनास दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने तपासणी करुन दि.०८.०१.२०१८ च्या शासन पत्रान्वये विविध विकास कामांच्या तसेच पुणे-सातारा रस्त्याच्या पुनर्बांधणीबाबतच्या प्रकरणी पुणे महानगरपालिकेस मार्गदर्शक सूचना दिलेल्या असून त्या अनुषंगाने दक्षता घेण्याबाबत कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(२६) * १४१५७७ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य)** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील उजनी धरण आणि टाकळी बंधा-यात पुरेसा पाणीसाठा असतानाही सोलापूर शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उन्हाळ्यामुळे पाण्याची मागणी वाढली असून अपु-या पाणी पुरवठयामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विस्कळीत पाणीपुरवठयाचा निषेध करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी संबंधित महानगरपालिकेसमोर निदर्शनेही केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) • सोलापूर शहराची सध्याची लोकसंख्या ११ लक्ष इतकी असून सध्या शहराची पाण्याची गरज प्रतिदिन १८० एमएलडी इतकी आहे.

• शहरास एकरुख तलाव, भीमा नदी (टाकळी) व उजनी जलाशय या ३ उद्भवावरुन पाणी पुरवठा होतो.

• यापैकी एकरुख तलावातील पाणीसाठा नोव्हेंबर, २०१८ मध्ये संपल्याने तेथून शहरास होणारा पाणी पुरवठा बंद होऊन एकूण पाणी पुरवठ्यात घट झाली आहे.

• त्याचबरोबर भीमा नदी (टाकळी) व उजनी जलाशय या उद्भवातील पाणीसाठ्यातही घट झाल्याने तसेच सदरच्या योजना जुन्या झाल्याने व त्या पूर्ण क्षमतेने चालू शकत नसल्याने दिनांक १० एप्रिल, २०१९ पासून शहराला चार दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत आहे, हे खरे आहे.

(२) उन्हाळ्यामध्ये पाण्याच्या जादा मागणीमुळे नागरिकांना काही प्रमाणात पिण्याच्या पाण्यासाठी त्रास होत होता, ही वस्तुस्थिती आहे.

(३) या संदर्भात महानगरपालिकेच्या काही सदस्यांनी मे, २०१८ मध्ये महानगरपालिकेसमोर निदर्शने केली होती. मात्र त्यानंतर आतापर्यंत विस्कळीत पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने कोणतीही निदर्शने लोकप्रतिनिधींकडून महानगरपालिकेसमोर करण्यात आलेली नाहीत, असे सोलापूर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) • सोलापूर शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या एकरुख तलाव, भीमा नदी (टाकळी) या योजनांचे पुनर्जीवन करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत रुपये ७१.६४ कोटी किंमतीची कामे प्रगतीपथावर असून माहे सप्टेंबर, २०१९ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

• या व्यतिरिक्त सोलापूर शहरास भविष्यातील १५ वर्षाची गरज विचारात घेऊन शहरास उजनी जलाशयातून ११० एमएलडी वाढीव पाणी पुरवठा करण्याची रुपये ४६०.७३ कोटी किंमतीची योजना स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राबविण्यात येत आहे. यासंदर्भात सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड, सोलापूर यांचेकडून निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईच्या पाणी पुरवठ्याकरिता पाताळगंगा नदीचे पाणी मोरबे धरणामध्ये टाकण्यासाठीचा प्रस्तावित प्रकल्प

**(२७) * १३६३१९ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराला पाणी मिळावे याकरिता पाताळगंगा नदीतून पाणी उचलून ते मोरबे धरणामध्ये टाकण्यासाठीचा प्रकल्प प्रस्तावित केला असून तो आयआयटीकडे व्यवहार्यता तपासणीकरिता माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाच्या व्यवहार्यता तपासणीचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच केव्हापासून सदर प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) • पावसाळ्यात पाताळगंगा नदीतून पाणी उपसा करून मोरबे धरणामध्ये टाकण्याचे नवी मुंबई महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.

• त्याअनुषंगाने पावसाळा कालावधीत पाताळगंगा नदीतुन ५०० द.ल.ली. प्रतिदिनी पर्यंत (पहिला टप्पा) व ७०० द.ल.ली. प्रतिदिनी पर्यंत (दुसरा टप्पा) पाणी उपसा करण्यासाठी पायाभूत सुविधांची उभारणी करणे या कामाबाबतचा Feasibility Report बनविण्यासाठी आवश्यक ते शुल्क कळविण्याचे आयआयटी मुंबई यांना दि.०५.०२.२०१९ च्या पत्रान्वये नवी मुंबई महानगरपालिकेने विनंती केली आहे.

• आयआयटी मुंबई यांनी दि. ०२.०४.२०१९ च्या पत्रान्वये नवी मुंबई महानगरपालिकेकडून तयार करण्यात येणाऱ्या Feasibility Report ची तपासणी करण्याचे शुल्क कळविले आहे.

• यानंतर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करण्यात येईल, असे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## बेलापूर (नवी मुंबई) येथील मरीना प्रकल्पास विलंब होत असल्याबाबत

**(२८) * १४०६४७ श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मरीना प्रकल्प नवी मुंबई सीबीडी बेलापूर येथे उभारण्यात येणार असून सिडको प्रशासनाच्या ठरावानुसार दिनांक २ जून, २०१७ रोजी वा त्या दरम्यान त्यास मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत सदर कामास सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प विकसित करण्याची जबाबदारी सिडको प्रशासन व मेरीटाइम बोर्डाची असतानाही सदर कामास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) खाजगी विकासकाकडून प्रकल्प राबविण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून निविदा प्रक्रिया पूर्ण केली आहे. निविदा प्रक्रियेअंती मे.स्वस्तिक इन्फ्रा-लॉजिक प्रा.लि., मे.ओशियन ब्ल्यू बोटींग प्रा.लि. आणि मे. हरेश्वर इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांच्या कन्सॉर्शियमची निविदाकार म्हणून निवड करण्यात आली असून त्यांना दिनांक २.११.२०१७ च्या पत्रान्वये लेटर ऑफ अवार्ड देण्यात आलेले आहे. पर्यावरण विषयक दाखल अद्याप प्राप्त झालेला नसल्याने प्रकल्पास विलंब होत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहीम (मुंबई) येथील कान्देवाली चाळ, वांजे वाडी या म्हाडाने संपादित केलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(२९) * १३८३०० श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहीम (मुंबई) येथील कान्देवाली चाळ, वांजे वाडी ही इमारत सुमारे तीस वर्षांपूर्वी पुनर्विकासासाठी म्हाडाने ताब्यात घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारत जमीनदोस्त करून बराच कालावधी होऊनही पुनर्विकासाची सुरवात न झाल्याने रहिवाशांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीच्या पुनर्विकासाकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदरची इमारत जमीनदोस्त करण्यात आलेली आहे. परंतु, उक्त भूखंड हा महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील रस्ता रुंदीकरणासाठी (DP Road Widening) राखून ठेवलेल्या जागेने बाधीत होत असल्यामुळे तसेच सदर भूखंड अरुंद असल्यामुळे, सदर इमारतीची पुनर्बांधणी करणे शक्य होत नसल्याचे म्हाडाने कळविले आहे. अशा उपकरप्राप्त इमारतीमधील

भाडेकरु/रहिवाशी यांना बृहतसुचीवर गाळा वितरीत करण्यात येतो. त्यासाठी संबंधित भाडेकरु/रहिवाशी यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे रितसर अर्ज सादर केल्यानंतर, सदर भाडेकरु/रहिवाशी पात्र असल्यास, त्या भाडेकरु/रहिवाश्यांस मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या प्रचलित पध्दतीनुसार बृहतसुचीवर गाळा वितरीत करण्यात येतो. सदर इमारतीचा स्वतंत्ररित्या पुनर्विकास/पुनर्बांधणी करणे शक्य नसल्यामुळे आजुबाजुच्या भूखंडावरील इमारतीसह सामुहिकरित्या पुनर्विकास करण्यासाठी व्यवहार्यता/ शक्यता (Feasibility) पडताळणीसाठी म्हाडामार्फत वास्तुविशारद यांची नेमणूक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विविध भागांतील धोकादायक पुलांची दुरुस्ती करण्याचा महानगरपालिकेलेने घेतलेला निर्णय

**(३०) * १३६६९२ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील गोखले पूल दुर्घटनेनंतर महानगरपालिकेने मुंबईतील विविध भागांतील ९ धोकादायक पुलांची दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक १८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुलांच्या दुरुस्तीसाठी महानगरपालिकेने सुमारे ३२ कोटींची तरतूद करुनही प्रशासन या पुलांच्या दुरुस्तीबाबत विलंब करीत असल्यामुळे दुर्घटनेचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या धोकादायक पुलांची तातडीने दुरुस्ती करण्यासोबतच या प्रकरणी विलंब करणा-या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्वेक्षणाअंती २९ पूल धोकादायक ठरले होते.

त्यापैकी ३ पुलांच्या पुनर्बांधणीकरिता कार्यादेश देण्यात आले असून, ५ पुलांच्या पुनर्बांधणीकरिता निविदा मागविण्यात आल्या आहेत.

७ पुलांच्या पुनर्बांधणीचे प्रस्ताव महापालिका स्थायी समितीस मंजुरीकरीता सादर करण्यात आले आहेत.

११ पुलांचे पुनर्बांधणीचे प्रस्ताव प्राधान्याने तयार करण्यात येत आहेत.

उर्वरित ३ पैकी १ पुलाची पुनर्बांधणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे व २ पुलांची वापराकरीता आवश्यकता नसल्यामुळे त्यांची पुनर्बांधणी करण्यात येणार नाही.

धोकादायक आढळलेल्या २९ पुलांपैकी आतापर्यंत ८ पूल निष्कासित करण्यात आले आहेत. पुलांच्या दुरुस्तीसाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मीरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सीमेलगत उभारलेल्या रेडीमिक्स कॉंक्रीट प्लांटबाबत

**(३१) * १३६५३३ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गावाजवळील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सीमेलगत प्रदुषण निर्माण करणारे सुमारे ८ रेडीमिक्स कॉंक्रीट प्लांट (आरएमसी) उभारले असून हे प्लांट शासनाच्या अटीशर्ती च्या नियमाचे उल्लंघन करून सुरु असून सदर प्रकल्पांची परवानगी रद्द करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करून देखील अद्याप कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन निलंबन करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे सिमेलगत सुमारे १०० मी. अंतरापलीकडे ना-विकास, रहिवास व औद्योगिक क्षेत्रात "महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, ठाणे" यांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून ८ रेडीमिक्स काँक्रीट प्लांटला (आर.एम.सी.) ११ महिन्याच्या कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात परवानगी दिली, ही वस्तुस्थिती आहे.

• स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक ग्रामस्थ यांचेकडून आर.एम.सी. प्लांटबद्दल प्राप्त तक्रारीस अनुसरून सदर आर.एम.सी. प्लांट सुरू ठेवावे किंवा कसे याबाबत दि.२१.०६.२०१९ च्या पत्रान्वये "महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, ठाणे" यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

• महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, ठाणे यांच्या प्राप्त होणाऱ्या अभिप्रायानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करणार असल्याचे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा शहरास नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत

**(३२) * १३५४६६ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा हे जागतिक वारसा प्राप्त पर्यटन स्थळ असल्याने देश-विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक अजिंठा लेणी बघण्यासाठी येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अजिंठ्याची लोकसंख्या जवळपास २५,००० च्या वर असून भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिकदृष्ट्या अजिंठा शहर विकसित असल्याने व नगरपंचायत म्हणून घोषित करण्यासाठी लागणाऱ्या निकषात बसत असल्याने ग्रामपंचायत अजिंठाने तसा ठराव सन २०१७ व २०१८ मध्ये संमत करुन शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठरावाच्या अनुषंगाने अजिंठा शहराला नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अजिंठा ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याबाबतचा ठराव अजिंठा ग्रामपंचायतीने संमत केला आहे, ही वस्तुस्थिती आहे.
• तथापि, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतूदींनुसार याबाबतचा आवश्यक प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशीसह शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात रस्त्यांच्या डांबरीकरणानंतरही १० हजार ८३८ खड्डे आढळून आल्याबाबत

**(३३) * १४२१७४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेने गत चार वर्षात ५०० रस्त्यांचे डांबरीकरण केले असून अनेक भागातील रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात सुरू असतांनासुध्दा हॉटमिक्स विभागाने नागपूर शहरात दिनांक १ एप्रिल, २०१८ ते दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीमध्ये १० हजार ८३८ खड्डे शोधुन काढले असल्याची माहिती दिनांक १ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने शोधुन काढलेल्या खड्डयांची आकडेवारी शासकीय असून या खड्डयांमुळे अनेक ठिकाणी अपघात होत असल्याने निरपराध लोकांचा बळी जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन खड्डेमुक्त धोरण युध्द पातळीवर राबवित असतांनासुध्दा नागपूर शहरात मोठया प्रमाणात रस्त्यावर खड्डे आढळून आल्याने हे खड्डे बुजविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महानगरपालिकेने, दिनांक ०१ एप्रिल, २०१८ ते दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीमध्ये शहरातील महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या रस्त्यांवरील लहान व मोठे असे एकूण १०,८३८ खड्डे बुजविण्याची कार्यवाही केली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या रस्त्यांवरील खड्डयांमुळे अपघात झाल्याची घटना महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) नागपूर महानगरपालिकेच्या अखत्यारितील रस्त्यांवरील खड्डे कायमस्वरुपी बुजविण्याच्या संदर्भात, नागपूर महानगरपालिकेकडून नियमितपणे कार्यवाही करण्यात येत असल्याचे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

-----------------

## ठाणे येथील गृहनिर्माण संस्थेच्या मलप्रक्रिया केंद्रामध्ये सफाई करताना ३ कामगारांचा गुदमरुन झालेला मृत्यू

**(३४) * १३९१२२ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे परिसरातील ढोकाळी नाका येथील प्राइड प्रेसिडेन्सी लक्झेरिया या सोसायटीतील मलनिस्सारण प्रक्रिया केंद्रातील टाक्यांच्या सफाईचा ठेका कंत्राटदार श्री.वैभव पाटील यांना सोसायटीने दिला असता उक्त सफाईसाठी ठेकेदाराने आठ जणांना दिनांक १० मे, २०१९ रोजी दुपारच्या सुमारास आणून सफाईचे काम सुरू केले असता मलनिस्सारण टाकीत गुदमरून तीन कामगारांचा मृत्यू झाल्याचे दिनांक ११ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यामधील अशा प्रकारची आठवड्याभरातील ही दुसरी दुर्घटना आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित ठेकेदाराने कामगारांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीच व्यवस्था केली नव्हती, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून संबंधितांसह सोसायटीवर कोणती करवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच मृत कामगारांच्या कुटुंबियांना भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

ढोकाळी परिसरातील प्राईड प्रेसिडेन्सी लक्झेरिया या गृहसंकुलनाचे मलप्रक्रिया केंद्रामध्ये दिनांक १०.०५.२०१९ रोजी साफसफाई करताना ३ कामगांराचा गुदमरून मृत्यू झाला असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) ठाणे शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत अशा प्रकारची अन्य घटना घडली नसल्याचे गृह विभागाने कळविले आहे.

(३) संबंधित गृह निर्माण संस्थेने महानगरपालिकेस न कळविता त्यांचे स्तरावर सफाई कामगारांच्या जीवित सुरक्षिततेची काळजी न करता अथवा सुरक्षा सहाय्य न देता साफ-सफाईचे काम दिले असल्याने कापुरबावडी पोलीस स्टेशन येथे संबंधितांविरुध्द भा.दं.वि. कलम ३०४ (अ), ३४ सह प्रोव्हीबेशन ऑफ एम्लॉयमेंट ॲज मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स ॲन्ड रिहॅबिलीटेशन ॲक्ट, २०१३ चे कलम ७, ९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) या प्रकरणी मयत कामगारांच्या वारसांना भरपाई मिळण्याकरीता आयुक्त, कामगार न्यायालय, ठाणे यांनी कर्मचारी भरपाई अधिनियम, १९२३ च्या कलम १० A अन्वये सोसायटी व सबंधित एजन्सीला नोटीस पाठविली असल्याचे कामगार विभागाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माटुंगा (मुंबई) येथील बिग बाजारसह गोरेगाव पूर्वेकडील धर्मा प्रॉडक्शनच्या गोदामाला लागलेल्या आगीबाबत

**(३५) * १३५४१९ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटुंगा (मुंबई) येथील बिग बाजारसह गोरेगाव पूर्वेकडील धर्मा प्रॉडक्शनच्या गोदामाला लागलेल्या आगीनंतर मुंबईतील अग्निसुरक्षतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रहिवासी आणि औद्योगिक ठिकाणी घडत असलेल्या घटनांतून अग्निसुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत ठोस निर्णय घेऊन अग्निसुरक्षा नियमांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माटुंगा (पश्चिम) येथील बिग बाजार व गोरेगांव (पूर्व) येथील धर्मा प्रोडक्शनच्या गोडाऊनची इमारत येथे माहे एप्रिल, २०१९ मध्ये आगीची दुर्घटना घडली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील परिशिष्ट क्रमांक १० अन्वये सुरक्षा विषयक सल्लागाराची नेमणुक करणे बंधनकारक असून, त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सुध्दा निश्चित करण्यात आल्या आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात अग्निसुरक्षेच्या यंत्रणेची कठोरपणे अंमलबजावणी करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अग्निशमन केंद्रावर स्वतंत्र अग्निसुरक्षा पालन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

एखाद्या ठिकाणी आग प्रतिबंधक उपाययोजनांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित भोगवटाधारकास किंवा मालकास महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या कलम ६ अन्वये आवश्यक त्या उपाययोजना हाती घेण्याबाबत निर्देश देणारी नोटीस बजावण्यात येते.

भोगवटाधारक/मालकाने विहित मुदतीत अग्निविमोचन यंत्रणा कार्यान्वित न केल्यास मुदत संपल्यावर त्यांचेविरुध्द न्यायालयीन प्रक्रिया सुरु केली जाते.

आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजनांच्या अपर्याप्ततेमुळे अशा जागेची किंवा तिच्या भागाची स्थिती, त्यातील व्यक्तींना धोकादायक वाटत असेल तेव्हा, तेथील लोकांना बाहेर जाण्यास सांगून/काढून संबंधित इमारत, आस्थापना इत्यादी कलम ८(३) व नियम ११(१) नुसार सीलबंद करण्याची कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानोरा (जि.वाशिम) येथील नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्रमांक तीन व चारमध्ये रस्त्याचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३६) * १४००२६ श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानोरा (जि.वाशिम) येथील नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्रमांक तीन व चारमध्ये पेव्हर ब्लॉकचे रस्ता बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असून शासनाच्या निधीचा गैरव्यवहार करणाऱ्या कंत्राटदार व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी लेखी निवेदनाद्वारे

मुख्याधिकारी, मानोरा नगरपरिषद यांच्याकडे दिनांक २ एप्रिल रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने नगरपरिषद मुख्याधिकारी, मानोरा यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) अशा आशयाचे निवेदन मुख्याधिकारी, नगरपंचायत मानोरा यांना दिनांक २ एप्रिल, २०१९ रोजी प्राप्त झाले आहे.
(२) व (३) नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक ३ व ४ मधील कामे महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) या योजनेंतर्गत व सर्वसाधारण रस्ता निधी अंतर्गत प्राप्त निधीतून करण्यात येत आहेत.
• सदर कामे सुरु करण्यापूर्वी त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या साहित्याच्या गुणवत्तेबाबतची तपासणी शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम यांचेकडून करुन घेण्यात आली होती.
• या कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरिक्षण (Third Party Audit) करुन घेण्याच्या हेतूने शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम यांना दिनांक १५ मे, २०१९ व दिनांक २२ मे, २०१९ रोजी कामाची तपासणी करण्यास कळविण्यात आले आहे.
• या कामाशी संबंधीत कंत्राटदारांना देय रक्कमांपैकी १०% रक्कम व सुरक्षा ठेव आणि अनामत रक्कम या रक्कमा लेखा परिक्षण अहवाल प्राप्त होईपर्यंत प्रदान न करण्याचा निर्णय नगरपंचायतीने घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गायमुख (ठाणे) चौपाटी ते वर्सोवा ब्रीजपर्यंत उन्नत मार्ग तयार करण्याबाबत

**(३७) * १३५९४६ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक**

**(ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील घोडबंदर रोडवरील गायमुख जकात नाका परिसरातील अत्यंत तीव्र व धोकादायक वळणावर वाहनांचे अपघात होऊन जिवीत तथा वित्तहानी होत असल्याने गायमुख चौपाटी ते वर्सोवा ब्रीज (फाऊंटन हॉटेल) पर्यंत उन्नत मार्ग तयार करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास तसेच वारंवार आयुक्त, एमएमआरडीए तसेच प्रशासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उन्नत मार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक २५.०३.२०१९ रोजी सुमारास मा.आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या कार्यालयात मागणीपत्र दिले असल्याने त्याची प्रत महामंडळाकडे अद्याप प्राप्त झाली नाही. महाराष्ट्र शासनाने सदर प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास दिनांक १३.०६.२०१७ अन्वये कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून घोषित केले आहे.

सदर उन्नत मार्गाचे काम मार्गी लावण्याकरीता कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आला. दिनांक १३.०६.२०१७ रोजी झालेल्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत रु. ६६७.३७ कोटी अंदाजित खर्चास मंजूरी देण्यात आली आहे. सदर प्रकल्पास लागणाऱ्या वनखात्याच्या व नॅशनल वाईल्ड लाईफ बोर्डच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केलेले असून प्रस्ताव मंजूरीसाठी पाठपुरावा चालू आहे. सदर मंजूरी प्राप्त झाल्यास प्रकल्पाचे काम त्वरीत हाती घेता येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गव्हाण (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सर महम्मद युसुफ ट्रस्टची ८० एकर जमिन भूमीराज ग्रुपच्या संचालकांनी हडप केल्याबाबत

**(३८) * १३८४१६ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुटेगांव (ता.औसा, जि.लातूर) येथून शेतकरी असल्याचा बोगस दाखला व इतर बनावट कागदपत्राच्या आधारे शासकीय कागदपत्रात फेरफार करून गव्हाण (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सर महम्मद युसुफ ट्रस्टची ८० एकर जमिन भूमीराज ग्रुपचे संचालक बांधकाम विकासक श्री.भुपेंद्र शहा आणि महसुल विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्या संगनमताने हडप केल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने न्हावा-शेवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असल्याची बाब दिनांक ६ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे,

(२) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील न्हावाशेवा पोलीस ठाणे येथे गु.र.न. १२४/२०१८ भा.द.वि. कलम ४२०, ४६५, ४६७,४६८, ४७१,१२०(ब), ३४, दिनांक ०३/१२/२०१८ अन्वये ७ व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासनाच्या ट्रॅन्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेंट धोरणामुळे मुंबई महानगरपालिकेचे नुकसान होणार असल्याबाबत

**(३९) * १३५१२४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण),**

**श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मेट्रो प्रकल्पासह वाहतूक निधी उभारण्यासाठी ट्रॅन्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेंट (टीओडी) धोरणास माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणामुळे प्रिमिअम एफएसआयचे दर निश्चित करताना ते निवासी बांधकामासाठी रेडिरेकनरच्या ५० टक्के तर व्यावसायिक मिळकतीसाठी ६० टक्के निश्चित केले असून टीडीआरला चालना मिळावी याकरिता प्रिमियम एफएसआय विकत घेताना २५ टक्के टीडीआरच्या वापरासाठी मुभा दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाजारात सध्या टीडीआरचे दर हे रेडिरेकनरच्या दराच्या ४० ते ४५ टक्के असल्यामुळे ते प्रिमियम एफएसआयपेक्षा १० ते १५ टक्के कमी आहे त्यामुळे बाजारात टीडीआरचे मार्केट वाढून महानगरपालिकेस आरक्षणे ताब्यात घेता येतील, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, टीडीआर २५ टक्के वापरातील काही हिस्सा मेट्रोला रोख रकमेत महानगरपालिकेकडून देणे बंधनकारक केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यामुळे महानगरपालिकेस काहीच फायदा मिळणार नसून महानगरपालिकेच्या सुविधांवर ताण पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार महानगरपालिकेचे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (७) राज्यातील नागरी वाहतूक धोरणाचा मसूदा शासन सूचना दि. १/०६/२०१७ द्वारे प्रसिध्द करण्यात आला असून त्यामध्ये ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट (टिओडी) ला चालना देण्याबाबत तरतूद प्रलंबित आहे.

शासन नगर विकास विभाग अधिसूचना दि. ०८/०५/२०१८ द्वारे बृहन्मुंबई विकास योजना-२०३४ सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ला शासनाने मान्यता दिली असून सदर विकास योजना सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली दि.०१/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे.

मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये ट्रान्सिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट (टिओडी) संबंधी तरतूद करण्याबाबत विनियम ३३(२३) मध्ये अंतर्भाव करण्यात आला असून ट्रान्सिट ओरिएंटेड डेव्हलपमेंटसाठी (टिओडी) चटई क्षेत्र निर्देशांकासाठीचे नियम, मास ट्रान्सपोर्ट कॉरीडॉरला चालना देण्यासाठीच्या इतर नियमांसह स्वतंत्ररित्या तयार केले जातील असे त्यामध्ये नमूद आहे. तथापि, अशी स्वतंत्र नियमावली अदयाप तयार करण्यात आलेली नाही. सदर विनियम ३३(२३) ची तरतुद लागू केली नसून तात्पुरती स्थगित (abeyance) ठेवण्यात आली आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.